**प्रेस नोट** दिनांक २३/०२/२०२६

(१) नानासाहेब गणपतराव मोखडे, वय ५५ वर्षे, पद केंद्र नायक, जिल्हा समादेशक होमगार्ड कार्यालय, परभणी. रा. जुबेर मामु, जुना आरा मशीन लाईन, हिंगोली. (२) माणिक शंकरराव वाडेकर, वय ५० वर्षे, प्रशासिक अधिकारी, जिल्हा समादेशक होमगार्ड कार्यालय , परभणी रा. जुना पेडगाव रोड, रायगड नगर परभणी. (३) ज्ञानोबा बाबुराव लटपटे, वय ४९ वर्षे, वरिष्ठ पलटन नायक जिल्हा समादेशक होमगार्ड कार्यालय, परभणी. रा. रवि मुंढे, यांच्या घरी गोल्डन इंग्लीश स्कुलच्या बाजुला गंगाखेड जि.परभणी हे १२,०००/- रूपयांची लाच स्विकारले प्रकरणी ऐ.सी.बी.च्या जाळयात.

| | |
|---|---|
| युनिट | लाप्रवि युनिट परभणी. |
| पो.स्टे.गुरनं व कलम | पोस्टे नानलपेठ. जि. परभणी . कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू आहे. |
| गुन्हा दाखल दिनांक | दि.२३.०२.२०२६ रोजी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू आहे. |
| आरोपी यांचे नाव, हुद्दा व पत्ता. | (१) नानासाहेब गणपतराव मोखडे, वय ५५ वर्षे, पद केंद्र नायक, जिल्हा समादेशक होमगार्ड कार्यालय, परभणी. रा. जुबेर मामु, जुना आरा मशीन लाईन, हिंगोली.वर्ग ( क)<br>(२) माणिक शंकरराव वाडेकर, वय ५० वर्षे, प्रशासिक अधिकारी, जिल्हा समादेशक होमगार्ड कार्यालय, परभणी रा. जुना पेडगाव रोड, रायगड नगर परभणी. वर्ग ( क)<br>(३) ज्ञानोबा बाबुराव लटपटे, वय ४९ वर्षे, वरिष्ठ पलटन नायक जिल्हा समादेशक होमगार्ड कार्यालय, परभणी. रा. रवि मुंढे, यांच्या घरी गोल्डन इंग्लीश स्कुलच्या बाजुला, गंगाखेड जि.परभणी. इलोसे |
| लाच स्विकारली रक्कम | १२,०००/- रूपये |

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांनी दि.२०/०२/२०२६ रोजी तक्रार दिली की, तक्रादरदार यांना दि.३१.१२. २०२५ रोजी पलटण नायक पदाची पदोन्नती देण्यात आलेली आहे. तक्रारदार यांना देण्यात आलेल्या पदोन्नती करिता बक्षीस म्हणून जिल्हा समादेशक होमगार्ड कार्यालय परभणी येथील केंद्र नायक मोखडे, प्रशासिक अधिकारी वाडेकर आणि वरिष्ठ पलटण नायक लटपटे हे २५,०००/- रूपयांची मागणी करत असून त्यापैकी ८०००/- रूपये तक्रारदार यांनी फोन पे द्वारे वरिष्ठ पलटण नायक लटपटे यांना यापूर्वी पाठवले आहेत. उर्वरित रक्कम १७,०००/- रूपयांची केंद्र नायक मोखडे, प्रशासिक अधिकारी वाडेकर आणि वरिष्ठ पलटण नायक लटपटे हे लाचमागणी करत असल्याची तक्रार प्राप्त झाली आहे.

सदर तक्रारी वरून दि. २०/०२/२०२६ रोजी जगदंबा हॉटेल जिंतूर रोड, परभणी येथे करण्यात आलेल्या लाच मागणी पडताळणी कारवाई दरम्यान केंद्रनायक नानासाहेब मोखडे आणि प्रशासिक अधिकारी माणिक वाडेकर यांनी तक्रारदार यांना देण्यात आलेल्या पलटण नाईक पदाच्या पदोन्नती करीता बक्षीस म्हणून सुरुवातीस २५,०००/- रू. मागून ८०००/- रू. फोन पे द्वारे वरिष्ठ पलटन नायक ज्ञानोबा लटपटे याला पाठवल्याचे मान्य करून राहिलेल्या रक्कमे पैकी तडजोडअंती १२,०००/- रूपयांची मागणी केली. सदर लाच रक्कम वरिष्ठ पलटन नायक लटपटे यांच्याकडे देण्यास सांगितल्याचे निष्पन्न झाले.

दि.२३/०२/२०२६ रोजी हॉटेल रायबा जिंतूर रोड, परभणी येथे करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान वरिष्ठ पलटण नायक ज्ञानोबा लटपटे यांनी तक्रारदार यांच्याकडून पंचासमक्ष १२,०००/- रू. स्वत: स्विकारले आहे. ईलोसे लटपटे यांना लाचेच्या रक्कमेसह व लोकसेवक नानासाहेब मोखडे केंद्र नायक, जिल्हा समादेशक होमगार्ड कार्यालय, परभणी व लोकसेवक माणिक शंकरराव वाडेकर, वय ५० वर्षे, प्रशासिक अधिकारी, जिल्हा समादेशक होमगार्ड कार्यालय, परभणी यांना ताब्यात घेण्यात आले आहे.

| | |
|---|---|
| सापळा पथक | श्री अल्ताफ मुलाणी पोलीस निरीक्षक, पोह/नामदेव आदमे, पोह/मदन शिंपले, मपोह/सिमा चाटे, पोना/बेद्रे, पोशि/अतुल कदम, कल्याण नागरगोजे, शेख जिब्राईल, बोधनकर, चापोशि/नरवाडे व लहाडे, सर्व लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, परभणी. |
| सापळा व तपास अधिकारी | श्री राहुल तरकसे, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग परभणी. |

**लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या इसमाविरुध्द तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा.**


| | |
|---|---|
| **संपर्क पत्ता :- कार्यालय पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, शनिवार बाजार,नानलपेठ, परभणी.** | |
| **मा. पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड :-** 9226484699. | |
| **पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, परभणी :-** 8411808328, 9870313157, 9272211064. | |
| दुरध्वनी क्रमांक :– 02452&220597 टोल फ्री क्रमांक:– 1064 ऑनलाईन ॲप acbmaharastra.net | |
| spacbnanaded@mahapolice.gov.in | dyspacbparbhani@mahapolice.gov.in |
| Facebook : Acb Parbhani | Facebook page : Anti Corruption Bureau,Parbhani. |
| Instagram : acbparbhani | Twitter : @ACBPARBHANI |
| Youtube Channel @ACBParbhani | Find us on Google Map & Mappels india Map |


पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,परभणी

Scanned with OKEN Scanner